प्रत्येक दिवस नवीन आव्हानांसाठी सज्ज असतो

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | रविवार २५ मे २०२५ | अंक १६२● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु






# वैष्णवी हगवणे प्रकरणात कोणालाही सोडलं जाणार नाही - एकनाथ शिंदे

पुण्यातून एक दुर्दैवी घटना समोर आली आहे, ती म्हणजे वैष्णवी हगवणे नावाच्या तरुणीने गळफास घेऊन आत्महत्या केली. सासरच्या छळाला कंटाळून तीने आम्हत्या केल्याचा आरोप होत आहे. या प्रकरणानं महाराष्ट्रात खळबळ उडाली आहे. दरम्यान उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यानंतर आज आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देखील कस्पटे कुटुंबाची भेट घेतली आहे. घडलेली घटना ही अतिशय दुर्दैवी आणि माणुसकीला काळीमा फासणारी असल्याचं यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे.दरम्यान या प्रकरणात पोलिसांनी आज मोठी कारवाई केली आहे, वैष्णवीचं स्त्रीधन जप्त करण्यात आलं आहे, तसेच तिचा पती आणि तिचा दीर यांच्याकडे असलेलं परवानाधारक पिस्तूल देखील जप्त करण्यात आलं आहे, तसेच तिच्या सासऱ्यानं पळून जाण्यासाठी जी कार वापरली होती ती देखील जप्त करण्यात आली आहे. या प्रकरणात आज वैष्णीचे दोन्ही भाऊ आणि तिच्या एका मैत्रिणीचा जबाब नोंदवण्यात आला आहे.या कार्यक्रमाला सांगलीचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्यासह राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, खासदार विशाल पाटील, आमदार सुरेश खाडे, आमदार गोपीचंद पडळकर, आमदार विश्वजित कदम यांच्यासह पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**काय म्हणाले एकनाथ शिंदे?** घडलेली घटना ही अतिशय दुर्दैवी आणि माणुसकीला काळीमा फासणारी आहे. पैसे मागत होते, मारहाण करत होते, या सगळ्या घटना घडत होत्या. लोकांची मानसिकता बदलायला हवी, सून म्हणजे मुलगीच असते. अतिशय दुर्दैवी फोटो आहेत. वैष्णवीच्या आई वडिलांची मानसिकता खालावली आहे.समाज प्रगत झाला आहे, राज्यात अशा घटना घडणे वाईट आहे. अमानवी घटना आहे. नऊ महिन्याचं बाळ समोर असातना मुलगी असं करू शकत नाही. या सर्व प्रकरणावर मुख्यमंत्री लक्ष ठेवून आहेत, पोलीस काम करत आहेत. घटनेला जबाबदार असणाऱ्या कोणालाही पाठीशी घालू नये. कुटुंबाची भावना लक्षात घेऊन राज्य सरकार कडक कारवाई करेल, अशा कोणत्याही घटनात राजकारण होता कामा नये, परिस्थिती बदलायला हवी, अशा घटना घडू नये म्हणून कारवाई अपेक्षित आहे, कठोर कारवाई केली जाईल, मुख्यमंत्री लक्ष ठेवून आहेत, उच्चस्तरीय चौकशी सुरू आहे, यामध्ये कोणीही असेल त्याला गृहविभाग सोडणार नाही, कोणालाही पाठिशी घातलं जाणार नाही, असं यावेळी एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे.

# बीडवासियांच्या देशभक्तीने ओथंबलेली शिवसेनेची भव्य तिरंगा रॅली संपन्न!

## मंत्री संजय शिरसाट यांनी तिरंगा रॅलीस हिरवा झेंडा दाखवून केला प्रारंभ



बीड, प्रतिनिधी- नापाक पाकचे मनसुबे उद्धवस्त करणारे ऑपरेशन सिंदूर यशस्वीपणे राबवणाऱ्या भारतीय सैन्याच्या सन्मानार्थ काल शनिवार दि २४ मे २०२५ रोजी दु. 12: 00 वाजता महाराष्ट्र राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा शिवसेना नेते मा. ना. संजयजी शिरसाट साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत बीडवासियांच्या देशभक्तीने ओथंबलेली शिवसेनेची भव्य तिरंगा रॅली संपन्न झाली. या तिरंगा रॅलीत बीडवासियांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन उत्स्फूर्त प्रतिसाद दिला तर या रॅलीत युवकांनी ट्रॅक्टरमध्ये सैनिकांची वेशभूषा परिधान करून आपले देशप्रेम व्यक्त केले. याबरोबरच असंख्य तरुण हाती तिरंगा झेंडा घेऊन भर पावसात भारत माता की जय, वंदे मातरम या घोषणा देत मोटारसायकलवर स्वार झाले. मंत्री ना. संजयजी शिरसाट साहेब यांनी सर्वोप्रथम विश्ववंदनीय भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून तिरंगा रॅलीस हिरवा झेंडा दाखवून रॅलीचा प्रारंभ केला. यानंतर लागलीच शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, जिल्हाप्रमुख स्वप्निल गलधर यांच्यासह तिरंगा रॅलीत सहभागी झाले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यापर्यंत ही भव्य रॅली काढण्यात आली. सर्वांनी मिळून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले आणि नंतर सीमारेषेवर मातृभूमीसाठी बलिदान देणाऱ्या शूरवीरांना सामूहिक श्रद्धांजली अर्पण केली. देशाच्या मातीसाठी, आपल्या लेकरांसाठी, आपल्या भविष्यासाठी आपल्या प्राणांची तमा न बाळगता लढणाऱ्या भारतीय सैन्याला अभिवादन करण्याकरिता भर पावसात बीडमधून प्रतिष्ठित नागरिक तथा असंख्य तरुण राष्ट्रीय ध्वज हाती घेऊन रॅलीत सहभागी झाले होते, यावरून बीडकरांच्या निस्सीम देशभक्ती आणि देशप्रेमाचे दर्शन घडून आले. याप्रसंगी शिवसेना विभागीय सचिव अशोकपटवर्धन साहेब, बीड जिल्हा संपर्कप्रमुख बाप्पूसाहेब मोरे, माझे सहकारी जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, स्वप्नील गलधर, युवासेनेचे बाजीराव चव्हाण, विपुल पिंगळे, अविनाश जाधव, सागर बहिर, अलकाताई डावकर, चंद्रकलाताई बांगर, रविराज बडे, सुजित शिंदे, गणेश शिराळे, मनोज चव्हाण यांच्यासह शिवसेना, महिला आघाडी, युवासेना, शेतकरी सेना, एसटी कामगार सेना ओबीसी व्हिजेएनटीसेना तथा अंगीकृत संघटनांचे सर्व आजी-माजी पदाधिकारी लोकप्रतिनिधी आणि शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

००००००

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या बीड ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी दिपक काळकुटे

बीड प्रतिनिधी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई अंतर्गत बीड जिह्ला ग्रामीण जिह्लाध्यक्षपदी दैनिक सूर्योदयचे कार्यकारी संपादक दिपक काळकुटे यांची सर्वांमध्ये निवड करण्यात आली. त्यांच्याकडे बीड, शिरूर कासार, आष्टी, पाटोदा आणि गेवराई या तालुक्यांची जबाबदारी देण्यात आली आहे. बीड येथील शासकीय विश्रामगृह याठिकाणी शनिवार 24 मे रोजी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईची महत्वपूर्ण बैठक राज्याचे प्रदेश संपर्क प्रमुख वैभव स्वामी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकी मध्ये पत्रकार संघाचे छत्रपती संभाजीनगर येथे होत असलेल्या 15 जून रोजी विभागीय अधिवेशन संदर्भात सविस्तर चर्चा झाली. तसेच पत्रकार संघाचा बीड



जिह्लास्तरीय मेळावा 5 सप्टेंबर रोजी घेण्याचे निश्चित झाले. यासह विविध विषयावर चर्चा करण्यात आली. यावेळी सर्वांच्या उपस्थितीत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या बीड ग्रामीण जिह्लाध्यक्षपदी दिपक काळकुटे यांची निवड करण्यात आली.निवड होताच सर्वांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. तसेच दैनिक सूर्योदय कार्यालय बीड याठिकाणी सत्कार करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश संपर्क प्रमुख वैभव स्वामी सर, दैनिक सूर्योदयचे मुख्य संपादक गंगाधर (नाना ) काळकुटे, बीड जिह्लाध्यक्ष अमजद खान,जिह्ला सचिव शेख वशिम,महिला जिह्लाध्यक्षा शेख आयेशा,बीड जिह्लाध्यक्ष विनायक जाधव,महिला सचिव मोरे अनुप्रिता,पत्रकार संघाचे गेवराई तालुकाध्यक्ष अंकुश आतकरे,संघाच्या डिजिटल मिडियाचे जिह्लाध्यक्ष अनिल आगुंडे,केज तालुकाध्यक्ष चंद्रकांत पाटील,वडवणी डिजिटल मीडियाचे तालुकाध्यक्ष सतिष मुझमुले,पत्रकार विष्णू राठोड,सरपंच भास्कर हातागळे, व्यवस्थापक प्रवीण वडमारे,शंकर झाडे,शेख एजाज, सोमेश्वर सोनटक्के, एस. एम. पुसरेकर,अंकुश गवळी यांच्यासह पत्रकार बांधव उपस्थित होते.

# दिल्लीत मुसळधार पाऊस, अनेक भागांत पाणी साचले,

देशातील अनेक भागात मुसळधार अवकाळी पाऊस सुरु आहे. राजधानी दिल्लीत पावसाने धुमाकूळ घातला आहे. दिल्लीच्या आसपासच्या भागात हवामानात अचानक बदल झाला आहे. शनिवारी संध्याकाळी उशिरा भारतीय हवामान विभागाने (IMD) दिलेल्या इशाऱ्यानंतर काही तासांतच हवामानात मोठा बदल झालेला दिसून आला. शनिवार रात्री आणि रविवारी सकाळी दिल्लीत जोरदार वाऱ्यांसह विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस पडला. यामुळे अनेक भागात पाणी साचले. अनेक झाडे उन्मळून पडली. मिंटो ब्रिजवर कार पाण्यात बुडाली. वाहतूक आणि विमानसेवा प्रभावित झाली आहे.



# भारतात वाढत आहेत कोविड केसेस, स्वत: चे रक्षण करण्यासाठी या गोष्टी ठेवा लक्षात

कोरोना विषाणूच्या पहिल्या आणि दुसऱ्या लाटेने सर्वांना हादरवून टाकले होते. 2020 मध्ये पहिल्यांदाच त्याची प्रकरणे समोर येऊ लागली आणि त्यानंतर अनेक नवीन व्हेरिएंट समोर आले. त्यानंतर सर्वांना कोविड लसीकरण देखील दिले गेलेत, परंतु 5 वर्षांनंतरही कोविडची प्रकरणे वारंवार समोर येत आलीत. अशातच आता पुन्हा एकदा भारतातील अनेक राज्यांमध्ये कोविडच्या केसेस समोर आल्या आहेत. यावेळी समोर आलेल्या प्रकरणांमध्ये, कोविड प्रकाराला 'जेएन 1' असे नाव देण्यात आले आहे. हा कोविडचा प्रकार जुना असला तरीही आपण सर्वांनी सावधगिरी बाळगणे खूप महत्वाचे आहे. विशेषतः ज्यांची रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत आहे किंवा ज्यांना दररोज खूप गर्दी असलेल्या ठिकाणी कामाला जावे लागते अशा लोकांनी काळजी घ्यावी. कोविडच्या धोक्याच्या गांभीर्याबद्दल अद्याप कोणताही इशारा देण्यात आलेला नसला तरी, अलीकडील प्रकरणे पाहता, खबरदारी घेणे महत्वाचे आहे, कारण खोकणे, शिंकणे आणि अगदी हातांनीही हा विषाणू एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीमध्ये पसरतो. तर अशावेळेस आपण सर्वांनी कोणत्या गोष्टी लक्षात ठेवणे महत्वाचे आहे ते आपण आजच्या या लेखात जाणून घेऊयात... बाहेर पडताना ही काळजी घ्यातुम्ही जर बाहेर जात असाल तर मास्क नक्कीच वापरा, पण लक्षात ठेवा की तुम्ही दररोज स्वच्छ केलेला मास्कचा वापर करावा आणि त्याला पुन्हा पुन्हा स्पर्श करू नका.

# माजी आ.भीमराव धोंडे यांच्या अथक परिश्रमातून आष्टीत इंजीनिअरिंग पदवी कॉलेजला मान्यता

## गोरगरिबांसाठी ग्रामीण भागात उच्च शिक्षणाची दारे खुली केल्याने सर्वत्र आनंद

कडा (प्रतिनिधी) गेल्या ४० वर्षापासून सातत्याने आष्टी तालुक्यातील ग्रामीण भागामध्ये गोरगरीब सर्वसामान्य शेतकरी आणि कामगारांची मुले शिकावीत हा शाहू महाराज,कर्मवीर भाऊराव पाटील यांचा आदर्श घेत गावोगावी शाळा,कॉलेज स्थापन करून माजी आ. भीमराव धोंडे यांनी सर्वांगीण विकासाचे द्वार खुले केले आहे. दरम्यान नुकतीच शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या संस्थेस इंजिनिअरिंग पदवी कॉलेजची मान्यता मिळाल्याने आष्टी तालुक्यात आनंदोत्सव साजरा केला जात आहे.गेल्या अनेक वर्षापासून माजी आ.भीमराव धोंडे यांनी तालुक्यामध्ये शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या माध्यमातून ५० हून अधिक शाळा,कनिष्ठ महाविद्यालये,वरिष्ठ महाविद्यालये,पॉलिटेक्निक कॉलेज,अन्न व कृषी तंत्र महाविद्यालय,बी.एच.एम.एस, बी.ए.एम.एस.,बी.पी.एड, बी.एड.,डेअरी का?लेज,कृषी तंत्र विद्यालय,कृषी महाविद्यालय आदी सह विविध शिक्षण संस्थांच्या रूपाने सर्वसामान्यां साठी स्वावलंबी जीवनाचा मार्ग दाखवला आहे.या त्यांच्या शिक्षण संस्थांमधून हजारो मुले शिक्षण घेऊन महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात स्वावलंबी जीवन जगत आहेत.त्यांच्यासह त्यांची पिढी माजी आ.भीमराव धोंडे यांना धन्यवाद देत आहेत. नुकतेच शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ इंजिनिअरिंग कॉलेज या पदवी अभ्यासक्रमासाठी मान्यता मिळाल्याने माजी आ.भीमराव धोंडे यांची स्वप्नपूर्ती झाली आहे.मात्र भविष्यात कॅन्सर रुग्णालय ( ५०० खाटांचे १०० कोटी रु.खर्चुन) उभारण्याचा मनोदय असल्याचे माजी आ.भीमराव धोंडे यांनी दैनिक झुंजारनेताशी बोलताना सांगितले. दरम्यान, शिक्षणमहर्षी माजी आ. भीमराव धोंडे यांनी शिक्षण क्षेत्रामध्ये क्रांती केली आहे. सर्वसामान्यांची मुले योग्य मार्गाला जाऊन सर्व शिक्षण आष्टीसारख्या ग्रामीण तालुक्यात उपलब्ध करून नवा इतिहास रचण्यात आला आहे. नुकताच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद दिल्ली व महाराष्ट्र शासनाच्यावतीने भीमराव धोंडे यांच्या अथक परिश्रमाला प्रतिसाद देत शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ महेश इन्स्टिटयूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी आष्टी या पदवी अभियांत्रिकी अभ्यासक्रमाला मान्यता दिल्याने सबंध तालुक्यातील शिक्षण प्रेमींनी माजी आ. भीमराव धोंडे यांना अभिनंदन करून धन्यवाद दिले आहेत.



### ५०० खाटांचे कॅन्सर रुग्णालय उभारण्याचा मनोदय!

माजी आ.भीमराव धोंडे यांचे वडील कै.आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी हे कॅन्सर रोगामुळे मृत्यू पावले.याची सल कायम धोंडे यांच्या मनात आहे आणि म्हणून इथून पुढे परिसरातील एकही कॅन्सर रुग्ण या रोगाने मृत्यू पावला जाऊ नये,यासाठी भविष्यात भव्य ५०० खाटांचे अद्यावत कॅन्सर रुग्णालय उभारण्यात येईल असा मनोदय माजी आ.भीमराव धोंडे यांनी व्यक्त केला आहे.

मान्यता मिळालेले अभ्यासक्रम स्थापत्य अभियांत्रिकी,संगणक अभियांत्रिकी,यंत्र अभियांत्रिकीइलेक्ट्रिकल अभियांत्रिकी, , आर्टिफिसिअल इंटिलिजन्स अँड डाटा सायन्स,प्रत्येकी ६० प्रवेश क्षमता -

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
रविवार २५ मे २०२५
https://lokaarambh.com


## संपादकीय

## मोहम्मद युनूस हतबल

शेजाऱ्याचे जळके घर नेहमी आपल्यासाठी धोक्याची घंटा असते. त्या आगीच्या झळा सातत्याने आपणास बसून आपलीही त्यामुळे न भरून येणारी हानी होत असते. शेजारी चांगला असेल तर निर्धास्तपणे वावरू शकतो; परंतु शेजारी कुरापती करणारा, विध्वंस करणारा असेल तर आपणाला कधीही सुखाने झोप घेता येत नाही. याचा प्रत्यय भारताला १९४७ पासून सातत्याने येत आहे. भारताला चांगला शेजार न लाभल्याची या ७८ वर्षांमध्ये फार मोठी किंमत मोजावी लागली आहे व आजही मोजत आहे. पाकिस्तानचे आणि आपले संबंध लपून राहिलेले नाहीत. १९४७, १९६५, १९७१च्या युद्धात भारताकडून पराभूत होऊनही भारतद्वेषाची पाकिस्तानची खुमखुमी आजही कायम आहे. उघडपणे विजय मिळणे शक्य नसल्याने कधी पुलवामा, कधी २६/११ची घटना, काल-परवा घडलेली पहलगामची घटना हे पाकिस्तान पुरस्कृती दहशतवादी प्रकार असल्याचे सर्वांनाच माहिती आहेत. भारताच्या सहकार्याने व प्रयत्नाने ज्या बांगलादेशाची निर्मिती झाली आहे, तोच बांगलादेश चीनच्या सहकार्यामुळे आपल्यावर डोळे वटारण्याचे धाडस दाखवत आहे. चीनसारखा बलाढ्य शेजारी अरुणाचल प्रदेश व अन्य भागांतून आपल्या देशातील भागावर अतिक्रमण करण्याचे धाडस दाखवत आहेत पाकिस्तानच्या स्थापनेपासून. तेथील पंतप्रधानांची अखेर लष्करांच्या मर्जीनुरूपच झालेली आहे. बांगलादेशातही सध्या हेच चित्र सुरू आहे. बांगलादेशातील घडामोडींवर लष्कराचा प्रभाव वाढत चालला असून लष्कर नियंत्रणातच यापुढे बांगलादेशची वाटचाल होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. निवडणुकांच्या विषयावरून बांगलादेशमधील राजकारण सध्या तापण्यास सुरुवात झालेली आहे. काही दिवसांपासून युनूसच्या सरकारला अनेक गंभीर आव्हानांचा सामना करावा लागला आहे. देशाच्या लष्करासोबत त्यांना सामना करावा लागला आहे. बांगलादेशचे लष्करप्रमुख जनरल वकार-उझ-जमान यांनी अखेर अंतरिम सरकारचे मुख्य सल्लागार मोहम्मद युनूस यांना लवकर निवडणुका घ्याव्यात, लष्करी बाबींमध्ये हस्तक्षेप करणे थांबवावे आणि प्रस्तावित राखीन कॉरिडॉरसारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर लष्कराला माहिती द्यावी असा कडक संदेश दिला आहे. अंतरिम सरकारला या वर्षी डिसेंबरपर्यंत राष्ट्रीय निवडणुका घ्याव्या लागतील, अशी घोषणा बुधवारी ढाक्याच्या सेनाप्रांगन येथे जनरल वॉकर यांनी केली. बांगलादेशमध्ये गेल्या दोन दिवसांपासून अंतरिम सरकार आणि लष्कर यांच्यातील संघर्ष समोर आला आहे. लष्करी मुख्यालयात आपल्या अधिकाऱ्यांना संबोधित करताना लष्करप्रमुख जनरल वकार-उझ-झमा यांनी स्पष्टपणे सांगितले की, या वर्षी डिसेंबरच्या पुढे सार्वत्रिक निवडणुका पुढे ढकलल्या जाऊ नयेत. लष्करप्रमुखांनी इशारा दिला की युनूस यांच्या नेतृत्वाखालील अंतरिम सरकारला संवेदनशील राष्ट्रीय मुद्द्यांवर निर्णय घेण्याचा कोणताही संवैधानिक अधिकार नाही. राखीन कॉरिडॉरच्या मुद्द्यावर, मार्चपासून लष्कर म्हणत आहे की आमच्या संमतीशिवाय ते बांधणे बेकायदेशीर आहे. बांगलादेशातील म्यानमार सीमेवरील राखीन जिल्ह्यात मानवतावादी कॉरिडॉर बांधण्याच्या कथित योजनेवरून लष्कर आणि सरकार आमने-सामने आहेत. बांगलादेशचे परराष्ट्र सल्लागार तौहीद हुसेन यांनी जाहीर केले होते की, अंतरिम सरकारने अमेरिकेने प्रस्तावित केलेल्या राखीन कॉरिडॉरला सहमती दर्शविली आहे. लष्करप्रमुख वकार यांनी बुधवारी याला रक्तरंजित कॉरिडॉर म्हटले आणि अंतरिम सरकारला इशारा देत म्हटले की, बांगलादेश सैन्य कधीही सार्वभौमत्वाला हानी पोहोचवणाऱ्या कोणत्याही कृतीत सहभागी होणार नाही. तसेच कोणालाही तसे करण्याची परवानगी दिली जाणार नाही. यानंतर युनूस सरकारने यू-टर्न घेतला आणि सांगितले की, त्यांनी म्यानमार सीमेवरील राखीन कॉरिडॉरबाबत कोणत्याही देशाशी कोणताही करार केलेला नाही. ५ ऑगस्ट २०२४ रोजी शेख हसीना देश सोडून भारतात आल्या. प्रत्यक्षात देशभरात त्यांच्याविरोधात विद्यार्थी निदर्शने करत होते. ५ जून रोजी बांगलादेशातील उच्च न्यायालयाने नोकऱ्यांमध्ये ३० टक्के कोटा प्रणाली लागू केली, ढाका येथील विद्यापीठातील विद्यार्थी या आरक्षणाविरुद्ध निदर्शने करत होते. स्वातंत्र्यसैनिकांच्या कुटुंबीयांना हे आरक्षण दिले जात होते. तथापि, हसीना सरकारने नंतर हे आरक्षण रद्द केले; परंतु त्यानंतर विद्यार्थ्यांनी त्यांच्या राजीनाम्याची मागणी करत निदर्शने सुरू केली. हसीना आणि त्यांच्या सरकारविरुद्ध मोठ्या संख्येने विद्यार्थी आणि सामान्य लोक रस्त्यावर उतरले. या निषेधाच्या दोन महिन्यांनंतर, ५ ऑगस्ट रोजी त्यांनी पंतप्रधानपदाचा राजीनामा दिला. त्यानंतर अंतरिम सरकार स्थापन झाले. यानंतर शेख हसीना यांनी भारतात आश्रय घेतला आहे. शेख हसीना यांच्यानंतर बांगलादेशात मोहम्मद युनूस यांचे सरकार सत्तेवर आले खरे, पण हे सरकार चीन आणि पाकिस्तानच चालवत असल्याचे अल्पावधीतच स्पष्ट झाले. बांगलादेशची अर्थव्यवस्था चीनच्या विळख्यात सापडत आहे. एकेकाळी भारताचा मित्र असलेला बांगलादेश आता चीनच्या जवळ गेला आहे. मोहम्मद युनूस सरकार पान १ वरून.... महामंडळाच्या नवीन बसचे श्रेय आमदार व पुढारी या बसेसचे स्वागत करून स्वतःचा सन्मान करताना दिसतात. या बसगाड्या त्यांच्या प्रयत्नामुळे आल्या असल्याचा भास ते निर्माण करतात.

# सस्ती अदालत उपक्रमातून 560 शेतरस्ते व पाणंद रस्ते मोकळे

## समूपदेशनातून तब्बल 560 प्रकरणे सामंजस्याने निकाली

### सस्ती अदालतीमध्से काही प्रकरणात प्रत्यक्ष बांधावर जाऊन स्थळ पाहणी

## विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांचा विशेष पुढाकार

छत्रपती संभाजीनगर दि.24: (विमाका) मराठवाडा विभागातील आठही जिल्ह्लयातील शेतकऱ्यांना अतिक्रमित शेतरस्ते तसेच पाणंद रस्ते मोकळे करण्यासोबतच प्रलंबित प्रकरणाचा तातडीने निपटारा व्हावा यासाठी छत्रपती संभाजीनगर विभागामधील सर्व तालुक्यात सस्ती अदालत उपक्रम सुरू आहे. विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांच्या पुढाकारातून सुरू झालेल्या या उपक्रमामुळे समूपदेशनातून तब्बल 560 शेतरस्त्यां्रची प्रलंबित प्रकरणे सामंजस्याने निकाली काढण्यात आली आहेत. प्रशासन थेट बांधावर पोचल्याने शेतरस्ते मोकळे करून देण्यात यश आले आहे. राज्यातील जे शेतरस्ते, पाणंद रस्ते अस्तित्वात आहेत त्यांना क्रमांक देण्यात यावेत. शेतजमिनीमध्ये वहिवाट करण्यासाठी अस्तित्वात असलेले रस्ते काही ठिकाणी अरुंद आहेत. अशा ठिकाणी मोठी वाहने जाण्यास अडचण निर्माण होऊन तक्रारही होतात. राज्यातील सर्वच शिवपाणंद आणि शेतरस्त्यांची हद्द निश्चित करून त्यांची कामे दर्जेदाररीत्या पूर्ण करावी, शेतरस्ते बंद करणाऱ्यांवर महसूल प्रशासनामार्फत योग्य ती कार्यवाही करावी, शेत वहिवाट रस्त्याची तक्रार सुनावणी तहसीलदार यांच्याकडे होते. अशी रस्त्यांबाबत प्रलंबित असलेली प्रकरणे एका महिन्यात निकाली काढावीत. असे स्पष्ट आदेश राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहेत. महसूलमंत्री श्री बावनकुळे यांच्या सूचनेनुसार मराठवाडा विभागातील आठही जिह्लयातील गरजू नागरिक शेतकऱ्यांना अतिक्रमित शेतरस्ते व पाणंद रस्ते मोकळे करण्यासोबतच जलद न्याय मिळावा व प्रकरणाचा तातडीने निपटारा व्हावा यासाठी शासनाच्या सर्व संबंधित विभागाच्या



अधिकाऱ्यांना प्रत्येक माहिन्याच्या दुसऱ्या आणि चौथ्या शुक्रवारी शक्यतो तहसिल कार्यालयात किंवा गरजेनुसार मंडळ मुख्यालयाच्या ठिकाणी “ सस्ती अदालत” या नावाने हा उपक्रम सुरू आहे. विभागात 9 मे रोजी प्रथम सस्ती अदालत व 23 मे रोजी दुसरी सस्ती अदालत तहसिल कार्यालयात तसेच गरजेनुसार मंडळ मुख्यालयाच्या ठिकाणी घेण्यात आली. सस्ती अदालतीमध्से काही प्रकरणात प्रत्यक्ष बांधावर जाऊन स्थळ पाहणी करण्यात आली आहे. विभागीय आयुक्त श्री. गावडे यांनीदेखील अदालतीमध्ये ऑनलाईन सहभागी होत नागरीकांशी संवाद साधला. छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांच्या संकल्पनेतून कमी खर्चात आणि कमी वेळात शेतकऱ्यांचे रस्ते मोकळे करून देण्याची सस्ती अदालत योजना परिणामकारक ठरते आहे. शेतकरी हिताच्या दृष्टिकोनातून दोनशे रुपयात शेताच्या हद्दीची मोजणी या निर्णयाला गती देण्यासाठी विभागीय आयुक्त श्री गावडे यांनी विभागातील आठही जिल्ह्याचे निवासी उपजिह्लाधिकारी, उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांची दूरदृष्यप्रणालीद्वारे विभागीय आयुक्त यांनी बैठक घेतली आहे. सस्ती अदालती मध्ये मोठ्या प्रमाणावर प्रकरणे प्राप्त झाली असून त्यामधील बऱ्याच प्रकरणात समुपदेशन करुन प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत. जी प्रकरणे बऱ्याच कालावधीपासुन प्रलंबित होती अशा प्रकरणांमध्ये देखील समुपदेशन करुन सामंजस्याने प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत. छत्रपती संभाजीनगर विभागामध्ये आठही जिल्ह्यात आयोजित सस्ती अदालतीमध्ये एकुण 1280 प्रकरणे प्राप्त झाली असून त्यापैकी 560 प्रकरणे निकाली काढण्यात आलेली आहेत. उर्वरीत प्रकरणात देखील यापुढील सस्ती अदालतीमध्ये समुपदेशन करुन सामंजस्याने प्रकरणे निकाली काढण्यात येत असल्याचे विभागीय प्रशासनाकडून सांगण्यात आले. सस्ती अदालतीमध्ये तहसिलदार स्तरावर गरजू शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेऊन जास्तीत जास्त प्रकरणे सामंजस्याने व समुपदेशन करुन सोडविण्यासाठी कार्यवाही करण्यात येत आहे. वर्षानुवर्ष प्रलंबित रस्त्यांचे प्रकरणात समुपदेशन करुन सामंजस्याने मार्ग काढुन अनेक प्रकरणे निकाली काढली जात आहेत. तसेच सध्या पावसाळा सुरु होणार असून शेतकऱ्यांना पेरणीसाठी शेतात उपकरणे ने आण करणेसाठी रस्ता नसल्याने येणाऱ्या अडचणी देखील कमी होत आहेत. यामुळे गरजू शेतकऱ्यांचा जास्तीत जास्त फायदा करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. तरी या अदालतीचा गरजू शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे अवाहन विभागीय आयुक्त श्री. गावडे यांनी केले आहे. जिह्लानिहाय शेतरस्ते आकडेवारी अशी छत्रपती संभाजीनगरमध्ये प्राप्त 141, निकाली 44 तर शिल्लक प्रकरणे 97 जालना - प्राप्त 109, निकाली 38 तर शिल्लक प्रकरणे 71 परभणी- प्राप्त 242, निकाली 142 तर शिल्लक प्रकरणे 100 हिंगोली- प्राप्त 61, निकाली 25 तर शिल्लक प्रकरणे 36 नांदेड- प्राप्त 153, निकाली 59 तर शिल्लक प्रकरणे 94 बीड- प्राप्त 128, निकाली 53 तर शिल्लक प्रकरणे 75 लातूर- प्राप्त 278, निकाली 162 तर शिल्लक प्रकरणे 116 धाराशिव- प्राप्त 168, निकाली 37 तर शिल्लक प्रकरणे 131 एकूण- प्राप्त 1280, निकाली 560 तर शिल्लक प्रकरणे 720

# धर्मनिष्ठ छत्रपती संभाजी महाराजांचा इतिहास या विषयावर विरारमध्ये प्रेरणादायी कार्यक्रम संपन्न

प्रतिनिधी प्रांजली काळबेंडे विरार, २४ मे २०२५ — यंग स्टार ट्रस्ट व साहित्य चावडी यांच्या संयुक्त विद्यमाने “छत्रपती संभाजी महाराज जयंती”च्या निमित्ताने एक प्रेरणादायी सादरीकरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. “महापराक्रमी, धर्मनिष्ठ संभाजी महाराजांचा इतिहास” या विषयावर भर दिला गेलेला हा कार्यक्रम शनिवार, दिनांक २४ मे रोजी उत्साहात पार पडला.या कार्यक्रमात पुष्प ६९ या सत्राचा विषय “छावा, शंभूराजे” होता, ज्यात सहभागी साहित्यप्रेमींनी छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनातील विविध पैलूंवर आपल्या अभ्यासपूर्ण व विचारप्रवर्तक मते मांडली.या विशेष प्रसंगी वसईच्या सौ. प्रांजली प्रविण काळबेंडे (काव्यप्रांजू) यांना सरपंच




पदाचा सन्मान देण्यात आला. त्यांनी आपल्या भाषणात संभाजी महाराजांच्या बुधभूषण ग्रंथातील आदर्श नेतृत्वाच्या तत्त्वांचा आधुनिक सामाजिक, राजकीय व व्यावहारिक जीवनाशी अतिशय अभ्यासपूर्ण आणि तुलनात्मक दृष्टीकोनातून ऊहापोह केला. त्या म्हणाल्या, “संभाजी महाराजांची तत्त्वप्रणाली ही आजच्या काळात नेता निवडताना व कार्यकर्ता जोडताना मार्गदर्शक ठरू शकते. सामाजिक बांधिलकी जपणारी जीवनशैली हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.” कार्यक्रमाचे आयोजन सौ. सुरेखा कुरकुरे, मधुकर तुराळे सर, सौ. दीपाली जाधव आणि कवी विक्रांत केसूरकर यांनी उत्कृष्टपणे पार पाडले. सूत्रसंचालन मधुकर तुराळे सरांनी अतिशय सुत्रबद्ध पद्धतीने केले. कार्यक्रमाच्या शेवटी विक्रांत केसूरकर सरांनी आभार प्रदर्शन केले.कार्यक्रमाच्या यशानंतर, पुढील महिन्यात समूहाच्या वर्धापन दिनानिमित्त अधिक व्यापक कार्यक्रम आयोजित करण्याचे आश्वासन सुरेखा कुरकुरे ताईंनी दिले.

# पत्रकार संजय सूर्यवंशी यांना ज़िवे मारण्याची धमकी देणाऱ्या आ.बाबुराव कदम यांच्यावर कारवाई करा

## नांदेड जिल्हा पत्रकार संघाची जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांच्याकडे मागणी

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : तू माझ्या विरोधात बातमी छापतोस का तुला संपून टाकतो अशी भाषा वापरत जीवे मारण्याची धमकी हदगाव तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष तथा दैनिक देशोन्नतीचे पत्रकार संजय सूर्यवंशी यांना हदगाव हिमायतनगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बाबुराव कदम यांनी दिली असून यांच्यावर पत्रकार संरक्षण कायदा अंतर्गत कारवाई करावी अशी मागणी नांदेड जिल्हा मराठी पत्रकार संघाकडून जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांची भेट घेऊन निवेदनाद्वारे केली आहे. निवघा तळणी सर्कलमधील पंचवीस गावे २५ तासापासून अंधारात महावितरणचे अधिकारी नॉट रिचेबल या मथुळ्याखाली बातमी छापून त्या बातमीत गुडघ्यापर्यंत दस्ती घालणारे नेते आहेत तरी कुठे? असा कोट प्रकाशित केला होता. वास्तविक पाहता या बातमीत आमदार बाबुराव कदम यांच्या नावाचा अथवा भगव्या दस्तीचा असा कुठलाही उल्लेख सदरील पत्रकाराने केलेल्या दिसत नाही तरीसुद्धा आमदार कोहळीकर यांना ही बातमी का झोंबली असा सवाल या निमित्ताने उपस्थित होत आहे. त्यांनी चक्क फोन लावून संजय सूर्यवंशी यांना अश्लील भाषेत जीवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करावा व पत्रकार संजय सूर्यवंशी यांना पोलीस संरक्षण देण्यात यावे अशी मागणी नांदेड जिल्हा मराठी पत्रकार संघाने जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांची भेट घेऊन निवेदनाद्वारे केली आहे. या संदर्भाच्या अनुषंगाने शहरातील नामांकित पत्रकार व जिल्हाभरातील विविध वृत्तपत्राचे पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. आमदारांनी केलेल्या या कृत्याचा जिल्ह्यातील सर्व पत्रकारांनी निषेध व्यक्त केला अशीच परिस्थिती राहिली तर पत्रकारांनी वृत्तांकन करायचे कसे असे सवाल या निमित्ताने जिल्ह्याभरातील पत्रकारांनी उपस्थित केला. यावेळी जिल्हा मराठी पत्रकार



परिषदेचे उपाध्यक्ष प्रकाश कांबळे, अधिस्विकृती समितीचे अध्यक्ष विजय जोशी, माझी सरचिटणीस चारुदत्त चौधरी, माजी अध्यक्ष गोवर्धन बियाणी, हल्ला विरोधी कृती समितीचे अध्यक्ष ॲड प्रदीप नागापूरकर, पत्रकार संघाचे अध्यक्ष संतोष पांडागळे, ॲड. दिगंबर गायकवाड, प्रल्हाद लोहेकर, राम तरटे, लक्ष्मण भवरे, शेख मुजीब, गजानन कानडे, प्रभाकर लखपत्रेवार, संजय कोलते, अनुराग पोवळे, हरिहर धुतमल, गजानन चौधरी, मोहम्मद साकीर, यादव सुकापुरे, वैजनाथ गुड्डप, विकास राठोड, शेख समशुद्दीन, शेख जब्बार, धम्मदाता कांबळे, अब्दुल रजाक, सचिन मुगटकर, सिद्धार्थ चौदांते, शेख अब्दुल शेख हाफीज, संभाजी सोनकांबळे, शेख जुनेद, प्रवीणकुमार दुधारे, सुनील व्यवहारे, प्रशांत गवळे, गौतम वाठोरे, प्रभाकर लखपत्रेवार, रविकुमार लोणे, शुभम तुपकरी, इस्माईल पिंजारी ,लक्ष्मण बर्गे, शेषराव कंधारे, सूर्यकुमार यन्नावार, धनंजय सोळंके, प्रकाश महिफळे, रामप्रसाद चन्नावार , अंकुशकुमार देगावकर, अशोक गव्हाणे, माणिक मोरे , माधवराव देशमुख ,सुरज देशमुख, देवानंद महाजन, सतीश जारंडे , सुदर्शन कऱ्हाळे, गजानन कदम ,बंडू माटाळकर ,रामेश्वर बोरकर, शेख शहबाज, शेख रसूल, विशाल घोडेकर, माणिक मोरे, महेंद्र धोंगडे, सदानंद सोनाळे, गजानन जिद्देवार, राहुल बहादुरे, भगवान कदम ,शेख अल्ताफ ,दीपक सूर्यवंशी, गजानन कदम, रामेश्वर बोरकर, शमशोद्दीन, शेख जब्बार, अब्दुल रज्नाक, धम्मरत्न कांबळे, हाफिज कुरेशी यासह जिल्हाभरातील मोठ्या संख्येने पत्रकार उपस्थित होते.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
रविवार २५ मे २०२५
https://lokaarambh.com



## वाहनधारकांनो सावधान! वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करा – ठाणेदार शिंदे यांचे आवाहन



अपघातांची वाढती संख्या आणि त्यात बळी जाणाऱ्यांची वेदनादायक स्थिती पाहता मानोरा पोलीस स्टेशनचे ठाणेदार शिंदे यांनी नागरिकांना वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन केले आहे. शिंदे यांनी सांगितले की, आपल्या गाडीवर नियंत्रण नसणे, मोबाईलवर बोलणे, हेल्मेट व सीटबेल्टचा वापर न करणे, अल्पवयीन मुलांना वाहन चालविण्यास देणे, यामुळे गंभीर अपघात घडतात आणि कोट्यवधींची जीवितहानी होते. यासंदर्भात २२ मेपासून विशेष रस्ता सुरक्षा मोहीम हाती घेण्यात आली असून, यामध्ये मोटारसायकलस्वार, चारचाकी वाहने चालवणारे, वाहन परवाना नसलेले, तसेच वेगमर्यादा ओलांडणाऱ्या वाहनचालकांवर कठोर कारवाई केली जात आहे. आतापर्यंत: १२८,५१७ मोटारसायकलींवर कारवाई १०,००० रु दंड ठोठावला गेला आहे २,५०० शाळा/महाविद्यालयांमधून विद्यार्थ्यांपर्यंत जनजागृती पोहोचवली गेली आहे. शिंदे यांनी नागरिकांना वाहतूक नियमांचे पालन करून पोलीस प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन केले. "जीव वाचवण्यासाठी शिस्त हवीच," असे ते म्हणाले.

## नांदर ग्रामपंचायतीचे सरपंच विजय गायकवाड यांच्या वास्तुशांतीला सामाजिक उपक्रमांची नवी दिशा



नांदर ग्रामपंचायतीचे सरपंच आणि सामाजिक कार्यकर्ते आयु. विजय गायकवाड यांनी त्यांच्या नवीन घराच्या वास्तुशांती कार्यक्रमात पारंपरिक जल्लोषाऐवजी समाजोपयोगी उपक्रम राबवून एक आगळावेगळा आदर्श निर्माण केला आहे. वास्तुशांतीच्या दिवशी गायकवाड कुटुंबीयांनी शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप, झाडांचे रोप वाटप, तसेच स्वच्छता मोहिम राबवून समाजात सकारात्मक संदेश दिला. या उपक्रमात अनेक गावकऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. विजय गायकवाड यांनी आपल्या भाषणात सांगितले, "घर हे केवळ विटा-सिमेंटाचे नसते, तर ते संस्कारांचे असते. त्यामुळे नव्या घराच्या सुरूवातीसच समाजकार्यास हातभार लावण्याचा निर्णय घेतला." या कार्यक्रमामुळे गावात सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली असून, त्यांच्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. सामाजिक बांधिलकीचा आदर्श ठेवणारा हा उपक्रम इतरांसाठीही प्रेरणादायक ठरत आहे. कार्यक्रमास उपस्थित मान्यवर: नंदू काका पठाडे माजी सभापती, पंचायत समिती, पैठण अनिल हजारे माजी सरपंच, दादेगाव ज्ञानेश्वर वतारे माजी सरपंच, कौंदर आसमान दादा काळे उपसरपंच, नांदर दामोदर काळे सामाजिक कार्यकर्ते शिवाजी मगरे ग्रामपंचायत सदस्य, नांदर प्रवीण काळे ग्रामपंचायत सदस्य, नांदर प्रदीप नरके शिवसेना कार्यकर्ते या सर्व मान्यवरांनी गायकवाड कुटुंबीयांच्या सामाजिक उपक्रमाचे कौतुक केले आणि भविष्यातही अशा उपक्रमांना पाठिंबा देण्याचे आश्वासन दिले.

## अमृतच्या रांगोळी व निबंध स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

### सावरकर जयंतीदिनी मान्यवरांच्या हस्ते होणार विजेत्यांचा गौरव




बीड – महाराष्ट्र शासनाच्या स्वायत्त संस्था महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), बीड व दीनदयाल शोध संस्थान जनशिक्षण संस्था, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय रांगोळी व निबंध स्पर्धेला युवक-युवतींकडून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. ही स्पर्धा २२ मे २०२५ रोजी पांगरी रोडवरील जनशिक्षण संस्थानच्या आवारात पार पडली. या स्पर्धेत फक्त अमृतच्या लक्षित गटातील १२ ते ३० वयोगटातील युवक-युवतींनी सहभाग नोंदवला. अमृतच्या उद्दिष्टानुसार, ज्या समाज घटकांना कोणत्याही महामंडळाचा लाभ मिळत नाही अशा खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा संधीचं दार ठरली. रांगोळी स्पर्धेत १२ ते २१ वयोगटासाठी 'मेक इन इंडिया' आणि २१ ते ३० वयोगटासाठी 'माझी वसुंधरा' हे विषय होते. निबंध स्पर्धेत अनुक्रमे 'डॉ. आनंदी गोपाळ जोशी' आणि 'भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे' या विषयांवर विचार मांडण्याची संधी मिळाली. सहभागी स्पर्धकांनी उत्कृष्ट कला आणि लेखनकौशल्य दाखवले. प्रत्येक गटासाठी प्रथम क्रमांक ₹२०००, द्वितीय ₹१५००, आणि तृतीय क्रमांक ₹१००० अशी आकर्षक रोख पारितोषिके निश्चित करण्यात आली आहेत. स्वा. सावरकर जयंतीदिनी मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांचा गौरव व बक्षीस वितरण होणार आहे. या उपक्रमाला डॉ. (सौ.) सीमाताई जोशी व सुनंदाताई कुलकर्णी यांनी विशेष भेट देऊन प्रोत्साहन दिले. या यशस्वी आयोजनात जनशिक्षण संस्थानचे मा. संचालक श्री. गंगाधर देशमुख, अमृतचे जिल्हा व्यवस्थापक श्री. विशाल जोशी, सौ. सुमेधा मनसबदार, श्री. दिगंबर जोशी, श्री. सुमित धिरडे, जनशिक्षण संस्थानचे सर्व कार्यकर्ते यांचे विशेष योगदान लाभले.

# रत्नागिरी जिल्ह्यात ५० गावे व ५ तालुके पूरप्रवण घोषित ; जिल्हाधिकाऱ्यांचे सर्व यंत्रणांना सतर्क राहण्याचे आदेश

जिल्ह्यातील ५० गावे व चिपळूण, संगमेश्वर, राजापूर, खेड आणि रत्नागिरी हे पाच तालुके जिल्हा प्रशासनाकडून अधिकृतपणे पूरप्रवण म्हणून घोषित करण्यात आले आहेत. येत्या मान्सून काळात संभाव्य आपत्तींचा सामना करण्यासाठी सर्व संबंधित विभागांना सतर्क राहण्याचे आदेश जिल्हाधिकारी एम. देवेंदर सिंग यांनी दिले आहेत. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली नुकत्याच पार पडलेल्या जिल्हास्तरीय मान्सूनपूर्व आढावा बैठकीत पूरप्रवण गावे व तालुक्यांचे आपत्ती व्यवस्थापन आराखडे तयार करून आवश्यक त्या उपाययोजना तत्काळ राबवण्याचे निर्देश देण्यात आले. पावसाळ्यात दरवर्षी येणाऱ्या पाण्याच्या वाढीमुळे पूर, दरड कोसळणे, रस्ते बंद होणे आदी आपत्तीजनक परिस्थिती उद्भवत असल्याने प्रशासनाने सर्व यंत्रणांना २४ तास सतर्क राहण्याचा इशारा दिला आहे. जिल्हा नियंत्रण कक्ष २५ मेपासून २४ तास कार्यरत राहणार असून, प्रत्येक तालुक्यात शोध व बचाव कार्यासाठी आपत्ती



व्यवस्थापन प्रशिक्षण पूर्ण झाले आहे. चिपळूण येथे एनडीआरएफ पथकाची मागणी करण्यात आली आहे, तर जिल्ह्यात ३०० आपदा मित्र तयार ठेवण्यात आले आहेत. दरम्यान, वीज अटकाव यंत्रणा सर्व मोबाईल टॉवर व सरकारी कार्यालयांवर कार्यान्वित करण्यात आली आहे. नागरिकांनी 'दामिनी' अँप डाउनलोड करून वीज पडण्यापूर्वीची सूचना मिळवून सुरक्षित ठिकाणी जाण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. जिल्हा प्रशासनाने सर्व नागरिकांना खबरदारी घेण्याचे आणि आपत्तीच्या वेळी स्थानिक नियंत्रण कक्षाशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

# आनंद घना! ८ दिवस आधीच मान्सून केरळमध्ये दाखल; वादळवाऱ्यांना चकवा देत नैऋत्य मोसमी वाऱ्यांची आगेकूच

अरबी समुद्रामध्ये निर्माण झालेल्या चक्राकार वाऱ्यांची स्थिती मान्सूनच्या वाटचालीवर परिणाम करणार का, असा प्रश्न उपस्थित होत असतानाच एक कमालीची आनंदवार्ता समोर आली. केंद्रीय हवामानशास्त्र विभागाच्या वतीनं ही माहिती जारी करत मान्सून अखेर केरळात दाखल झाल्याचं वृत्त जाहीर करण्यात आलं. हवामान विभागाच्या माहितीनुसार नैऋत्य मोसमी वारे शनिवार 24 मे 2025 रोजी केरळमध्ये दाखल झाले असून, सामान्य तारखेच्या अर्थात 1 जूनच्या 8 दिवस आधीच मान्सून केरळमध्ये दाखल झाला



आहे असंही आयएमडीनं सांगत देशभरातील शेतकरी वर्गाला मोठा दिलासा दिला.

देशाच्या दक्षिणेकडे असणाऱ्या देवभूमीत मान्सून धडकला असून, आता तो पुढचा प्रवासही तुलनेनं अपेक्षित तारखेआधीच करत महाराष्ट्रापर्यंत साधारण आठ दिवस आधीच मजल मारेल असा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात येत आहे. त्यामुळं मे महिन्याच्या अखेरीस मान्सूननं तळ कोकणातून राज्याच प्रवेश केल्यास आश्चर्य वाटण्याचं कारण नाही. आश्चर्याची बाब म्दणजे 2009 नंतन नैऋत्य मोसमी वारे पहिल्यांदाच इतक्या लवकरच केरळमध्ये दाखल झाले आहेत. ज्यामुळं यंदा मान्सूनचा मुक्काम मोठा असेल असंही म्हटलं जात आहे.

## राज्यात मुसळधार पावसाचा इशारा - हवामान विभागाचा रेड अलर्ट

राज्यात २७ मेपासून पुढील पाच दिवस मुसळधार ते अतीमुसळधार पावसाचा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे. अरबी समुद्रात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे हा पाऊस होणार असून, पुढील ३६ तासांत हा पट्टा तीरावर धडकण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.
या पार्श्वभूमीवर कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील अनेक जिल्ह्यांना पावसाचा जोरदार फटका बसण्याची शक्यता आहे. रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांना शुक्रवारी रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे.



या जिल्ह्यांना सतर्कतेचा इशारा: पालघर, ठाणे, मुंबई, नाशिक, पुणे, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, बीड, हिंगोली, धाराशिव, अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा, वाशिम, यवतमाळ, अहमदनगर. प्रशासनाकडून नागरिकांना अनावश्यक प्रवास टाळण्याचे आवाहन करण्यात आले असून, हवामानाशी संबंधित अपडेटसाठी अधिकृत सूत्रांकडे लक्ष ठेवण्याचे सूचित करण्यात आले आहे.

## बांधकाम कामगारांसाठी सरकारी मदत योजना 2025: पात्रता, नोंदणी व फायदे

बांधकाम कामगारांसाठी सरकारी मदत योजना 2025: पात्रता, नोंदणी व फायदे प्रजा-शासन/प्रतिनिधी बांधकाम कामगार म्हणजे असे लोक जे घरे, रस्ते, पूल आणि इतर गोष्टी बनवतात. ते खूप मेहनत करतात. त्यांच्या कामामुळे आपले जीवन सोपे होते. पण त्यांच्या स्वतःच्या आयुष्यात मात्र खूप अडचणी असतात. त्यांना पैसे कमी मिळतात आणि अनेक वेळा मदतीची गरज असते. सरकारकडून मदत का मिळते? कामगारांना मदत करण्यासाठी भारत सरकार आणि महाराष्ट्र सरकारने काही योजना सुरू केल्या आहेत. या योजनेत कामगारांना पैसे, शिक्षण, आरोग्य आणि इतर गोष्टीसाठी मदत मिळते. कामगारांनी नोंदणी कशी करावी? योजना मिळवण्यासाठी कामगारांनी आधी नाव नोंदवावे लागते. यासाठी काही गोष्टी गरजेच्या असतात: कामगाराचे वय १८ ते ६० वर्षांच्या दरम्यान असावे. तो सुतारकाम, प्लंबर, लोहारकाम, मजुरी असे बांधकामाचे कोणतेही काम करत असावा. आधार कार्ड, बँक खाते, रेशन कार्ड, राहण्याचा पुरावा आणि मागील ९० दिवसांचे कामाचे कागद असावे. नोंदणी https://mahabocw.in या वेबसाइटवर किंवा जवळच्या कामगार कार्यालयात करता येते. नोंदणी झाल्यानंतर कामगाराला एक ओळखपत्र दिले जाते. कामगारांना मिळणारे फायदे 1. पैशांची मदत ६० वर्षांनंतर कामगारांना दर महिन्याला पेन्शन मिळते. काही अचानक गरज लागली तर २,००० ते ५,००० रुपये एकदाच दिले जातात. दिवाळीला बोनस म्हणूनही थोडे पैसे मिळतात. 2. शिक्षणासाठी मदत कामगारांच्या मुलांना शाळेसाठी दरवर्षी शिष्यवृत्ती दिली जाते. कॉलेज किंवा व्यावसायिक अभ्यासासाठीही पैसे मिळतात. पुस्तकं, गणवेश आणि इतर साहित्यासाठी मदत केली जाते. 3. लग्न आणि घरासाठी मदत लग्नासाठी सरकारकडून पैसे दिले जातात. ताट, वाटी, भांडी यासारख्या वस्तू मोफत दिल्या जातात. घर बांधण्यासाठी ५ ते ६ लाख रुपयांपर्यंत मदत मिळू शकते. काही वेळा तात्पुरत्या घरासाठीही पैसे दिले जातात. 4. आरोग्य आणि सुरक्षा अपघात झाल्यास विमा रक्कम मिळते. मोठ्या आजारांसाठी उपचार खर्च दिला जातो. कामाच्या ठिकाणी हेल्मेट, हातमोजे यांसारखी सुरक्षितता साधने दिली जातात. 5. इतर फायदे नवीन काम शिकण्यासाठी प्रशिक्षण दिले जाते. महिला कामगारांना बाळंतपणासाठी पैसे दिले जातात. कामगाराचा मृत्यू झाल्यास अंत्यसंस्कारासाठी मदत दिली जाते. फायदे मिळवण्यासाठी काय करावे? कामगारांनी अर्ज ऑनलाईन किंवा कार्यालयात करावा लागतो. अर्जाची तपासणी होते. सगळी माहिती बरोबर असल्यास पैसे थेट बँकेत जमा होतात. अर्जाची माहिती आपण ऑनलाईन पाहू शकतो. फायदे मिळवण्यासाठी काय करावे? कामगारांनी अर्ज ऑनलाईन किंवा कार्यालयात करावा लागतो. अर्जाची तपासणी होते. सगळी माहिती बरोबर असल्यास पैसे थेट बँकेत जमा होतात. अर्जाची माहिती आपण ऑनलाईन पाहू शकतो. योजनेचा उपयोग काय? या योजनेमुळे कामगारांना पैशांची मदत मिळते. त्यांच्या मुलांना शिकायला संधी मिळते. कुटुंबाला आधार मिळतो.

# कामखेडा ग्रामपंचायत निधीवर सरपंच झाले मालामाल, गाव मात्र कंगाल! भुमीगत गटारीसह १५ व्या वित्त आयोगाच्या निधीवर मारला डल्ला

## गावातील चिखलमय रस्त्यांमुळे संतप्त झालेल्या गावकऱ्यांनी बेशरामाची झाडे लावून केला भ्रष्ट कारभाराचा निषेध

बीड । प्रतिनिधी
बीड आणि गेवराई मतदार संघाच्या सिमेवर येणारे कामखेडा गावाची स्थिती सध्या ना घर का ना घाट का अशी झाली आहे. त्याला कारणही तसेच आहे. विधानसभा मतदार संघात हे गाव गेवराईत येत असून बीड पंचायत समिती अंतर्गत कामे होतात. त्यामुळे या गावाला कोणी वाली आहे की नाही असा प्रश्न उपस्थित होत असतांना याचाच फायदा घेवून गावच्या कारभाऱ्यांनी मात्र आपला मनमानी कारभार हाकत विकास निधीवर डल्ला मारुन गावाला मात्र वाऱ्यावर सोडले आहे. यामुळे कामखेड्याला बकाल स्वरुप आले असून गावासाठी आलेल्या 15 व्या वित्त आयोगाच्या निधीतून विकास कामे होणे अपेक्षीत असतांना एक रुपयाही खर्च न करता गावच्या कारभाऱ्यांनी आपला स्वार्थ साधत भूमीगत गटारीचे पाणी प्राशन करुन गावच्या विकासाची विल्हेवाट लावल्याने आज पावसाळ्याच्या तोंडावर गाव चिखलमय होऊ लागल्याने अखेर गावकऱ्यांनी याचा निषेध म्हणून रस्त्यावरील चिखलात बेशरमाची झाडे लावून या भ्रष्ट कारभाराचा निषेध आज नोंदवला आहे. बीड शहरापासून हकेच्या अंतरावर असलेल्या कामखेडा गावची लोकसंख्या सुमारे 3 हजाराच्यावर आहे. या गावात विविध धर्माचे आणि जातीचे लोक गुण्यागोंविदाने वास्तव करतात. मात्र राजकारणातील हेव्यादाव्यामुळे आजही हे गाव विकासापासून वंचित आणि उपेक्षीत असल्याचे दिसते. गावातील मतदारांचा विधानसभेसाठी गेवराईचे तर स्थानिक स्वराज्य संस्थेसाठी बीडचे लोकप्रतिनिधी आश्वासनावर येथील ग्रामस्थांची बोळवणे करतात. हा गेल्या काही वर्षांपासूनचा येथील रहिवाश्यांचा अनुभव असल्याच्या प्रतिक्रिया ग्रामस्थ व्यक्त करतात. त्यामुळे ना घर का, ना घाट का अशी अवस्था आमची झाल्याचे येथील रहिवाशी बोलत आहेत. 15 व्या वित्त आयोगातून गावच्या विकासासाठी भरघोस निधी शासनाने गावाला दिला. मात्र सिमावरती गाव असल्याने याकडे कोण लक्ष देणार म्हणून गाव कारभाऱ्यांनी अक्षरश: या निधीवर तुटून पडून गावच्या विकासाची विल्हेवाट लावली आहे. गावातील घन कचऱ्याचे नियोजन




असो की, भूमीगत नाल्यांसाठी आलेला निधी कागदोपत्री घोडे नाचवून हडप करण्यात आल्याचा आरोप गावकऱ्यांनी केला असून पूर्वी ज्या नाल्या गावातून काढण्यात आलेल्या होत्या. त्या देखील या कामामुळे बुजविण्यात आल्या आहेत. त्यामुळेच आजच्या मित्तीला गावातील सांडपाण्याचा निचरा होत नसून यंदा लवकरच मान्सूनचे आगमन झाल्याने पावसाचे पाणी देखील वाहून जाण्यासाठी कुठेच मार्ग नसल्याने परिणामी गावातील रस्ते चिखलमय झाले आहेत. यामुळे संपूर्ण गाव त्रस्त झाले असून सांडपाणी आणि पावसाच्या पाण्यामुळे गावातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून चिखलाने माखलेल्या रस्त्यामुळे मार्ग शोधण्याची वेळ ग्रामस्थांवर आल्याने संताप व्यक्त केल्या जात आहे. दरम्यान गाव कारभाऱ्यांचा भ्रष्ट कारभार आणि प्रशासनातील बाबूंचे साह्य आणि लोकप्रनिधींच्या वरद हस्तामुळे कामखेडा गावचा विकास खुंटल्याच्या प्रतिक्रिया गावकऱ्यांनी व्यक्त केल्या असून गावातील सांडपाण्यासह अंतर्गत रस्त्यांचा प्रश्न तात्काळ मार्गी लावण्यात यावा. तसेच गावच्या विकासाचा निधी गिळंकृत करणाऱ्या गावकारभाऱ्यांसह त्यांना पाठीशी घालणाऱ्या प्रशासनातील दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याच्या प्रमुख मागणीसाठी आज संतप्त गावकऱ्यांसह तरुणांनी गावातील चिखमलय झालेल्या रस्त्यावर बेशरमाच्या झाडे लावून निषेध आंदोलन केले. या आंदोलनात राजू पटेल, गणेश नेवडे, शेरु पटेल, बाबासाहेब नेवडे, मुस्ताक पटेल, कदीरभाई शेख, अन्वर शेख, समीर पटेल, मतीन शेख, विकास मस्के, रवी मस्के, जावेद पटेल, महेफूज पटेल, मोईन शेख, सय्यद आजीम, जुबेर शेख, लुकमान पटेल, शौकत शेख, राजेंद्र मस्के, आहद शेख, रवी सोनवणे, रमेश शिंदे, मुस्तकीम, नदीम, कौसर शेख, मतीन शेख यांच्यासह गावातील महिला अणि परुष मंडळी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
आंतरराष्ट्रीय



# भारतात आयफोनची निर्मिती केल्यास टॅरिफ, टिम कुक यांना डोनाल्ड ट्रम्पची धमकी

भारतात आयफोन निर्मिती सुरु करण्याच्या तयारीत असलेल्या ॲपलच्या अडचणी वाढत आहेत. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ॲपलचे सीईओ टिम कुक यांना भारतात आयफोनचे उत्पादन करु नका, असे काही दिवसांपूर्वी सांगितले होते. परंतु टिम कुक आपल्या निर्णयावर ठाम आहे. यामुळे डोनाल्ड ट्रम्प यांनी आता टेक कंपन्यांना धमकी दिली आहे. त्यासाठी टॅरिफचे अस्त्र काढले आहे. अमेरिकेत तयार न होणाऱ्या स्मार्ट फोनला 25 टक्के टॅरिफ लावण्यात येणार आहे. त्यामध्ये ॲपलच्या आयफोनचाही समावेश आहे. तसेच युरोपीय संघाच्या आयातीवर 50 टक्के टॅरिफ लावण्याची घोषणा ट्रम्प यांनी केली. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सोशल मीडियावर माहिती शेअर करताना म्हटले की, मी ॲपलचे सीईओ टिम कुक यांना सांगितले होते की, अमेरिकेत विकले जाणाऱ्या आयफोनची निर्मिती अमेरिकेतच झाली पाहिजे. हे आयफोन भारतात किंवा इतर देशामध्ये तयार करण्यात येऊ नये. अमेरिकेबाहेर तयार होणाऱ्या आयफोनला कमीत कमी 25 टक्के टॅरिफ द्यावा लागणार आहे. टीम




कुक यांनी भारतात ॲपलचे उत्पादन सुरु करण्याचा निर्णय घेतला होता.

त्यावेळी ट्रम्प यांनी आयफोनचे उत्पादन अमेरिकेतच झाले पाहिजे, असा इशारा दिला होता. अमेरिकेबाहेर तयार झालेले कोणतेही उत्पादन टॅरिफशिवाय विकू शकणार नाही. स्मार्टफोनवरील टॅरिफ ॲपल, सॅमसंगसह इतर टेक कंपन्यांना जूनच्या अखेरीस लागू होऊ शकेल. ॲपलने चीनमधून त्यांच्या आयफोन असेंब्लीचा प्लॅन्ट भारतात हलवण्याचा निर्णय घेतला आहे. परंतु आयफोनचे उत्पादन अमेरिकेत करण्याची त्यांची योजना नाही. त्याबाबत विश्लेषकांनी म्हटले आहे की अमेरिकेत आयफोनचे उत्पादन केल्याने किंमती शेकडो ते हजारो डॉलर्सने वाढतील. युरोपियन युनियनने मागील वर्षी अमेरिकेला 500 अब्ज डॉलर किमतीच्या वस्तू निर्यात केल्या. त्यामध्ये जर्मनी, आयर्लंड आणि इटली यांचा वाटा मोठा होते. परंतु ट्रम्प यांना आता त्यावर 50 टक्के कर लावण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे त्या देशांतील कार, औषधनिर्माण आणि विमाने यासारख्या उत्पादनांना मोठा फटका बसणार आहे. तसेच अमेरिकन ग्राहकांचा खर्च वाढणार आहे.

## बांगलादेशातील राजकीय संकट समाप्त

गेल्या काही दिवसांपासून बांगलादेशमधील राजकीय स्थिती चांगलीच ढासळत चालली आहे. याच कारणामुळे या देशाच्या अंतरिम सरकारचे प्रमुख मोहम्मद युनूस हे आपल्या पदाचा राजीनामा देण्याची शक्यता व्यक्त केली जात होती. मात्र बागलादेशच्या राजधानीत पार पडलेल्या बैठकीनंतर त्यांनी आपल्या पदावर कायम राहण्याचा निर्णय घेतल्याचं म्हटलं जातंय. तसेच आगामी काळात सरकार निष्पक्ष निवडणूक, न्यायप्राणाली, तसेच अन्य सुधारणांसाठी आम्ही प्रयत्नीशील राहू, अशी ग्वाही या अंतरिम सरकारने दिली आहे. मोहम्मद युनूस हेच अंतरिम सरकारच्या प्रमुखपदावर कायम मिळालेल्या माहितीनुसार बांगलादेशच्या अंतरिम सरकारचे प्रमुख आणि सल्लागार परिषदचेचे प्रमुख प्रोफेसर मोहम्मद युनूस यांनी नुकतेच एक बैठक बोलवली होती. या बैठकीत देशातील सध्याची राजकीय परिस्थिती, प्रशासनातील आव्हान आदी विषयांवर गंभीर चर्चा झाली. याच बैठकीत मोहम्मद युनूस हेच अंतरिम सरकारच्या प्रमुखपदावर कायम राहतील, असे ठरवण्यात आले आहे.अचानकपणे बैठकीचे आयोजनही बैठक संपल्यानंतर बांगलादेशच्या सल्लागार समितीने एक्स या समाजमाध्यमावर एक पोस्ट केली. ही बैठक राष्ट्रीय



आर्थिक परिषदेनंतर शनिवारी राजधानी शेर ए बांगला नगरातील योजना आयोगाच्या कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. अचानकपणे या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत निवडणूक, सुधारण तसेच न्याय यासारख्या प्रमुख मुद्दयांवर चर्चा करण्यात आली, असे या ट्विटमध्ये सांगण्यात आले.
देशातील कुहूमशाहाचे आगमन कोणत्याही... देशातील सर्वसामान्य कामकाजावर नकारात्मक परिणाम पडत आहे. वेगवेगळ्या राजयकीय पक्षांकडून अनाकलनीय मागण्या केल्या जात आहेत. वेगवेगळी आक्षेपार्ह विधानं केली जात आहेत. अशा कामांमुळे देशात शंका निर्माण होत आहे. या सर्व अडचणी असूनही आमचे अंतरिम सरकार त्याच्यावरची जबाबदारी पार पाडत आहे, असे मोहम्मद युनूस यांनी या बैठकीत सांगितले. तसेच सल्लागार परिषदेने सर्व पक्षांना एकता राखण्याचे आगामी निवडणूक तसेच न्यायव्यवस्था मजबूत ठेवण्यासाठी प्रयत्न करावा, असे आवाहन केले आहे. देशातील कुहूमशाहाचे आगमन कोणत्याही परिस्थितीत थांबवायला हवे, असेही या सल्लागार परिषदेने आवाहन केले आहे.दरम्यान, आता मोहम्मद युनूस हे आपल्या पदावर सध्यातरी कायम राहणार असून भविष्यात बांगलादेशमध्ये काय-काय घडामोडी घडणार?

## जगभरात एक्स झाले ठप्प, कोट्यवधी युजरना फटका, लॉग इन आणि पोस्ट करण्यात अडचणी

भारतासह जगभरात लोकप्रिय असलेली मायक्रो ब्लॉगिंक साईट एक्स ( आधीचे ट्वीटर ) शनिवारी सायंकाळी अचानक ठप्प झाली. त्यामुळे एक्सचे जगभरातील युजरना अडचणींना सामोरे जावे लागले. या एक्स साईटवर तास ते दीड तास गोंधळ उडाला. या साईटवरील सर्व पोस्ट करण्यात अडचणी येऊ लागला.भारत सहित जगभरात लोकप्रिय असलेले सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्स ( माजी ट्वीटर ) शनिवारी सायंकाळी अचानक ठप्प पडले. ज्यामुळे लाखो युजरना मोठा फटका बसला. अनेक युजरना लॉग इन करण्यात मोठी अडचणी येऊ लागल्या. अनेक युजरना नवीन पोस्ट करण्यात अडचणी येऊ लागल्या. एक्स डाऊन का झाले याचे कोणतेही कारण समोर आलेले नाही.
हा तांत्रिक बिघाडाचा फटका जगभरातील युजरना जाणवला आणि अनेक देशांतील वापरकर्त्यांनी ट्विटर इतर सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर डाऊन झाल्याची बातमी शेअर केली. भारतातही लाखो युजरना यामुळे समस्यांचा सामना करावा लागला, कारण सध्या X माध्यम हे राजकीय, सामाजिक आणि व्यावसायिक संवादाचे एक महत्त्वाचे माध्यम बनले आहे. काही तास एक्स स्लो डाऊन झाल्यानंतर दीड तासानंतर पुन्हा सेवा बहाल करण्यात आल्याचे निदर्शनास आले.

## जपानला मागे टाकत भारत जगातील चौथी मोठी अर्थव्यवस्था!




भारताने अखेर इतिहास घडवला. अनेक संकटांवर मात करत भारतीय अर्थव्यवस्थेने जगातील चौथ्या क्रमांकावर झेंडा रोवला आहे. अमेरिकेने भारताची आर्थिक कोंडी करण्याचा प्रयत्न केला. तरीही भारतीय अर्थव्यवस्थेने राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे डोळे पांढरे केले आहे. जपानला मागे सारत भारताने चौथ्या क्रमांकावर झेप घेतली आहे. तर आता जगातील तिसऱ्या सर्वात मोठ्या अर्थव्यवस्थेकडे भारताची आगेकूच सुरू आहे. विशेष म्हणजे तिसरा टप्पा भारताच्या दृष्टिक्षेपात आला आहे.

## एनडीएत पहिल्यांदा १७ महिला कॅडेट्स पासआऊट, ३० मेच्या परेडमध्ये नारी शक्ती दिसणार

नॅशनल डिफेन्स अकादमी अर्थात एनडीएची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर भारतीय लष्करात अधिकारी म्हणून प्रवेश करता येतो. यंदा १४८ व्या कोर्सच्या महिला कॅडेट्सचा पहिली बॅच त्रिसेवा अकादमीत पासआऊट होणार आहे. ३० मे रोजी त्यांची पासिंग आऊट परेड होणार आहे. असे पहिल्यांदा होणार आहे की ३०० हून पुरुष कॅडेट्स सह १७ महिला कॅडेट्स एनडीएतून ग्रॅज्युएट होणार आहेत. या सर्व महिला कॅडेट्स भारतीय लष्कर, वायू सेना किंवा नौदलात दाखल होऊ शकतात.



एनडीएच्या ऐतिहासिक १४८ व्या कोर्सच्या दीक्षांत समारंभात आणि

पासिंग आऊट परेडच्या आधी एनडीएत महिला कॅडेट्सच्या पहिल्या बॅचच्या काही कॅडेटने गेल्या शुक्रवारी देशाच्या प्रमुख त्रिसेवा अकादमीत आपल्या तीन वर्षांच्या प्रवासाबद्दल मोकळेपणे सांगितले. यापैकी एक कॅडेट्स इशिता शर्मा यांनी सांगितले की आम्हाला नेहमी समान संधी दिली गेली. आणि आमची जेंडर कधी आड आले नाही. सर्व महिला कॅडेट्समध्ये एकतेचे भावना पाहायला मिळाली. आम्ही एकमेकांच्या साथी दिल्याचे त्यांनी सांगितले. महिलात एनडीएत सामील होण्याची प्रेरणा मिळणारडिव्हीजन कॅडेट कॅप्टन इशिता शर्मा एनडीएत येण्याआधी दिल्ली युनिव्हर्सिटीत इकॉनॉमिक्स मध्ये ऑनर्स करीत होती. माझ्या मते एनडीएत महिलांनाचे सामील होणे आणि पहिल्या बॅचचे पास होणे महिला आणि महिला सशक्तीकरणासाठी खूप महत्वाचे आहे.जेव्हा महिलांना नेतृत्व करताना पाहीले जाते. तेव्हा त्यांना स्थायी कमिशन मिळते. यातून युवा महिलांना एनडीएत आणि सशस्त्रदलात सामील होण्याची इच्छा निर्माण होते.

# जपानमधील मंगा कलाकार रिओ तात्सुकी हिच्या भाकिताने सध्या खळबळ उडाली आहे

जगाची नवीन 'बाबा वेंगा'च्या भाकिताने संपूर्ण जपानची झोप उडवली आहे. ही भविष्यवाणी आहे पण तशी, त्यामुळे जपानच्या पर्यटन क्षेत्रावर जणू अवकाळा आली आहे. जुलै महिन्यात ज्या यात्रेकरूंनी जपान फिरण्याची योजना आखली होती, त्यांनी हा प्लॅन रद्द केला आहे. त्यांनी विमानाचे तिकीट रद्द केले आहेत. काहींनी हॉटेलचे बुकिंग रद्द केले आहे. त्यामुळे जपानच्या पर्यटन विभाग पण गडबडून गेला आहे. जपानची मंगा कलाकार रियो तात्सुकी (Ryo Tatsuki) हिच्या भाकिताने ही खळबळ उडाली आहे. तिला जपानची बाबा वेंगा



पण म्हणतात. तिची चर्चा यापूर्वी पण जागतिक मंचावर झाली आहे. तिच्या गूढ चित्रांनी सुद्धा जगाचा पसारा असा अनाकलनीय कसा, असा प्रश्न अनेकांना पडला आहे. जुलै 2025 साठी तिने केलेल्या भाकिताने गदारोळ माजला आहे. त्याचे कारण ही तसेच आहे. यापूर्वी तिने जे सांगितले ते घडलं, त्यामुळे आता लोक काळजी घेत आहे, काय आहे तिचे भाकीत?
काय आहे रिओ तात्सुकीची भविष्यवाणी? तर रिओ तात्सुकी ही चित्रकार तशीच एक लेखिका पण आहे. तिने "The Future I Saw" (2021 मधील सुधारीत आवृत्ती) मध्ये जुलै 2025 मध्ये जपान आणी आजूबाजूच्या देशांना नैसर्गिक संकटाचा मोठा सामना करावा लागेल, असे भाकीत केले आहे. या काळात समुद्रात गगनचुंबी लाटा उसळणार. एक विशाल त्सुनामी येणार. 2011 मधील तोहोकू भूकंपापेक्षा पण ही त्सुनामी विनाशकारी, नुकसानदायक असल्याचा अंदाज तिने वर्तवला आहे. जपान, तैवान, इंडोनेशिया, उत्तरी मारियाना बेट समूह, व्हिएतनामसह अनेक देशांच्या किनारपट्यांना त्याचा फटका बसेल असे भविष्य तिने वर्तवले आहे. त्याचा धसका पर्यटकांनीच नाही तर स्थानिक नागरिकांनी पण घेतला आहे.
त्यावेळी अचानक अतिरेक्यांनी निष्पाप नागरिकांवर गोळ्या झाडल्या. त्यानंतर भारत आणि पाकिस्तानमध्ये तणाव निर्माण झाला होता. भारताने अश्रूंचा बदला म्हणून पाकिस्तानचं पाणी रोखलं होतं. त्यानंतर 7 मे रोजी भारताने ऑपरेशन सिंदूर अंतर्गत पाकिस्तानातील अतिरेक्यांचे अड्डे नेस्तानाबूत केले होते. या भाकितामुले पूर्व आणि दक्षिण-पूर्व आशियातील पर्यटकानी, विशेष हाँगकाँग आणि तैवानमधील पर्यटकांनी धास्ती घेतली आहे. त्यातील काहींनी तर या काळातील बुकिंग रद्द केल्या आहेत. विमान कंपन्यांचे आणि हॉटेल बुकिंग कॅन्सलची जणू लाटच आली आहे. तर जपानची राजधानी टोकियोसह ओसाका आणि ओकिनावा या शहरातील हॉटेल आणि विमान सेवेचे बुकिंग 50 टक्क्यांपर्यंत घसरल्याचे समोर येत आहे. हाँगकाँगमधील WWPKG या टुरिस्ट ऑपरेटरनने पण जपानसाठीचे अनेक बुकिंग रद्द झाल्याचे म्हटले आहे. अनेक जण दक्षिण कोरिया, व्हिएतनाम आणि थायलंडमधील सुरक्षित बेटाकडे वळाले आहेत. यापूर्वी रिओ तात्सुकी हिने अचूक भविष्यवाण्या केल्या आहेत. तिने 2011 मधील तोहोकू भूंकप आणि काही इतर प्रमुख घटनांची नोंद तिच्या पुस्तकात केली होती. 1999 मध्ये हे पुस्तक बाजारात आले, तेव्हा तिच्या दाव्याकडे अनेकांनी फँटसी म्हणून पाहिले होते. पण जेव्हा या घटना घडल्या. त्यावेळी तिची मुलाखत घेण्यासाठी एकच गर्दी झाली. आता तिच्या याच पुस्तकाच्या सुधारीत आवृत्तीत असे भाकीत असल्याने हा गदारोळ उडाला आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com